# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**


**एम.आय.डी.सी.रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली - ४४२६०५**

**दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४, email:- gondwanaesst@gmail.com**


जा.क्र. गों.वि/आस्था/605 /२०१८

दिनांक : २१.०२.२०१८ 28.02.18

## परिपत्रक

विद्यापीठातील पदव्यूत्तर शैक्षणिक विभाग प्रमुख व सर्व संलग्नीत महाविद्यालयांचे प्राचार्य यांना कळविण्यात येते की, प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. युएनआय/(१८/१८)/अधि.३/विशि–१/१७४९ दि. ०९.०२.२०१८ चे अवलोकन करावे. सदर पत्रान्वये 'सोशल मिडीया' या वेगवान संपर्क साधनाचा विधायक उपयोग करून घेण्यासाठी आणि तरूणांना अधिकाधिक वाव देवून समाज अधिक विवेकी व्हावा यासाठी सोशल मिडिया महामित्र उपक्रम राबविण्याचे राज्य शासनाने ठरविले आहे. या उपक्रमामध्ये सहभागी होवून या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य करावे.

**सहपत्र: वरीलप्रमाणे**

कुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतीलिपी माहितीस्तव :—**

१. मा. कुलगुरू महोदयांचे स्विय सहायक, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. प्र—कुलगुरूचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
3. मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ....... दि. ........
जावक क्र. 15/3 दि. 15/2/18

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११ ००१.

www.dhepune.gov.in Email- vishi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२, २६१२४६३९ फॅक्स०२०/२६१११९५३

क्रमांक- युएनआय/(१८/१८)/अधी.३/विशि-१ /७५४९ दिनांक- 9 FEB 2018

प्रति,

विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य.

कुलसचिव
सर्व अकृषी विद्यापीठे.
महाराष्ट्र राज्य.

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 693 दि. 16-2-18
जावक क्र. ......... दि. .........

**विषय- सोशल मिडिया महामित्र उपक्रम राबविणेबाबत.**

संदर्भ- उपसंचालक(माहिती) पुणे विभाग पुणे यांचे क्रमांक
विमाका/पुणे/४७०/२०१८ दिनांक ०९.०२.२०१८

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भिय पत्राची प्रत सोबत जोडली आहे, कृपया अवलोकनी घ्यावी.

वरील संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येते की, भारतातील बहुतांश तरुण फेसबुक, व्हॉटसअॅप ट्विटर व तत्सम सोशल मिडियाचा मोठया प्रमाणात उपयोग करीत असतात. सोशल मिडिया हे ज्ञान आणि मनोरंजनाचे सहज उपलब्ध होणारे प्रभावी साधन आहेच पण लोकांची मने व मते घडविण्याची ताकत सोशल मिडियामध्ये असल्याचे दिसून आलेले आहे.

या वेगवान संपर्क साधनाचा विधायक उपयोग करुन घेण्यासाठी आणि तरुणांना अधिकाधिक वाव देवून समाज अधिक विवेकी व्हावा यासाठी सोशल मिडिया महामित्र उपक्रम राबविण्याचे राज्य शासनाने ठरविलेले आहे.

या उपक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी Google Play Store अथवा Apple Store वर MahaMitra हे अॅप्लीकेशन डाऊनलोड करावे लागेल. ही नोंदणी प्रक्रिया दिनांक ०१ फेब्रुवारी पासून सुरु होणार असून १८ फेब्रुवारी, २०१८ पर्यंत नोंदणी करता येणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील १५ वर्षांवरील कोणीही रहिवासी नि:शुल्क सहभागी होऊ शकणार आहे.

आस्था
3/5/2

प्रत्येक तालुक्यातून प्रत्येकी १० सोशल मिडिया महामित्र निवडले जातील . यांना जिल्हास्तरावर समाज माध्यमाच्या सदुपयोगाबाबत गट चर्चेसाठी आमंत्रित केले जाईल. तसेच मा.जिल्हाधिकारी यांचे नेतृत्वाखाली जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक. यांचेसमवेत ही गटचर्चा करण्यात येईल. जिल्हास्तरावरील कार्यक्रम सर्वसाधारण ५ ते १७ मार्च या कालावधीत होईल. या गट चर्चेअंती तालुक्यातील प्रत्येकी एका महामित्राची राज्य स्तरावर होणा-या कार्यक्रमासाठी निवड करण्यात येईल.

मा.मुख्यमंत्री महोदयांच्या उपस्थितीत होणा-या राज्य स्तरावरील कार्यक्रमात समाज माध्यम क्षेत्रात प्रभावी असलेले विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवरांना आमंत्रित करण्यात येईल. या कार्यक्रमात सोशल मिडिया महामित्र पुरस्कार देण्यात येईल हा कार्यक्रम मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवडयात होईल.

तरी सदरची बाब आपल्या विद्यापीठाचे विभाग तसेच संलग्नित सर्व महाविद्यालये, संस्था यांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे.

(सुर्यश दुसाने)
प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत- श्री.मोहन राटोड,उपसंचालक(माहिती) पुणे विभाग, नवीन मध्यवर्ती इमारत, तळमजला, पुणे-१ यांना माहितीस्तव सादर.

महाराष्ट्र शासन


विभागीय माहिती कार्यालय,
नवीन मध्यवर्ती इमारत, तळमजला,
ससून रुग्णालय समोर, पुणे - ४११००१

दूरध्वनी: ०२०-२६१२३४३५
फॅक्स: ०२०-२६११९५२०

ईमेल :ddpune@gmail.com
ddipune@yahoo.co.in


जा.क्र./विमाका/पुणे/ ४८०० /२०१८ दि. ९/२/२०१८

(उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१
9 FEB 2017
3948
आवक क्रमांक:-
शाखा:-

प्रति,
मा. संचालक
उच्च शिक्षण विभाग,
पुणे

**विषय : "सोशल मीडीया महामित्र" उपक्रम राबवण्याबाबत.**

**महोदय,**

भारत हा तरुणांचा देश आहे, असे म्हटले जाते. भारतातील बहुतांश तरुण फेसबुक, व्हॉट्सअॅप, ट्विटर, इन्स्टाग्राम व तत्सम सोशल मीडीयाचा मोठया प्रमाणात उपयोग करीत असतात. सोशल मीडीया हे ज्ञान आणि मनोरंजनाचे सहज उपलब्ध असे होणारे प्रभावी साधन आहेच पण लोकांची मने व मते घडवविण्याची ताकद सोशल मीडीयामध्ये असल्याचे अनेकदा सिध्द झाले आहे.

आधुनिक युगातील वेगवान संपर्क साधनाचा विधायक उपयोग करुन घेण्यासाठी आणि तरुणांना अधिकाधिक वाव देऊन समाज अधिक विवेकी व्हावा, यासाठी **"सोशल मीडीया महामित्र"** हा उपक्रम राबविण्याचे राज्य शासनाने ठरविले आहे.

या उपक्रमामध्ये सहभागी हाण्यासाठी "Google play store" अथवा Apple च्या App Store वर MahaMitra हे अॅप्लीकेशन डाऊनलोड करावे लागेल. या अॅप्लीकेशनमध्ये नाव, वय, पत्ता हे तपशील देऊन नोंदणी करावयाची आहे. ही नोंदणी प्रक्रिया दिनांक १ फेब्रुवारी रोजी सुरु होणार असून १८ फेब्रुवारी पर्यंत नोंदणी करता येणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील १५ वर्षावरील कोणीही रहिवासी नि:शुल्क सहभागी होऊ शकेल.

प्रत्येक तालुक्यातून (क्षेत्रातून) प्रत्येकी १० "सोशल मीडीया महामित्र" निवडले जातील या १८ जणांना जिल्हास्तरावर समाज माध्यमाच्या सदुपयोगाबाबत गट चर्चेसाठी आमंत्रित केले जाईल. जिल्हाधिकारी नेतृत्वाखाली जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलिस आयुक्त, पोलिस अधीक्षक, यांच्यासमवेत ही गटचर्चा आयोजित करण्यात येईल. जिल्हास्तरावरील कार्यक्रम सर्वसाधारण ५ ते १७ मार्च या कालावधीत होईल. या गटचर्चेअंती तालुक्यातील क्षेत्रातील प्रत्येकी एका महामित्राची राज्यस्तरावर होणाऱ्या कार्यक्रमासाठी निवड करण्यात येईल.

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या उपस्थितीत होणाऱ्या राज्य स्तरावरील कार्यक्रमात समाज माध्यम क्षेत्रात प्रभावी असलेले विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवरांना आमंत्रित करण्यात येईल. या कार्यक्रमात "सोशल मीडीया महामित्र" पुरस्कार देण्यात येईल. हा कार्यक्रम मार्च महिन्यात शेवटच्या आठवडयात होईल.

**आपल्या कार्यालयाच्या अधिनस्त असणा-या विद्यापीठ, शैक्षणिक संस्थांना अनुलोमच्या प्रतिनीधींना सहकार्य करण्याबाबत आपल्या स्तरावर लेखी सुचना देण्यात याव्यात, ही विनंती.**

आपला विश्वासू

(मोहन राठोड)
उपसंचालक(माहिती)
पुणे विभाग, पुणे